**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

**विद्यापीठाच्या ज्ञानस्त्रोत केंद्राद्वारे भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम**

अमरावती-

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या ज्ञानस्त्रोत केंद्राद्वारे भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती दि. १५ ऑक्टोबर, २०१८ रोजी विद्यापीठातील ज्ञानस्त्रोत केंद्राच्या सेमिनार हॉलमध्ये वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी होणार आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर भूषविणार असून प्रमुख वक्ते म्हणून कला व वाणिज्य महाविद्यालय, कुऱ्हा येथील प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख उपस्थित राहतील. जयंतीप्रसंगी ग्रंथ प्रदर्शनीसह सामुहिक वाचनाच्या माध्यमातून 'वाचनाध्यास' कार्यक्रम देखील आयोजित करण्यात आला आहे.

तरी या संधीचा जास्तीतजास्त संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. मोहन खेरडे यांनी केले आहे.

---

प्रति,
**जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दि. ११/१०/२०१८.
दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी